# भारतीय कृषि अनुसंधान परिषद (आयसीएआर) ने रब्बी पिकाची काढणी, मळणी व काढणीपश्यात साठवणूक व विपणन यासाठी covid-19 च्या उद्रेक व प्रसार कालावधीत पुढीलप्रमाणे सल्ला दिला आहे.

## पिकांची काढणी व मळणी :-

COVID-19 च्या उद्रेक व प्रसार कालावधीत रब्बी पिके परिपक्वतेच्या अवस्थेत आहेत. बाजारपेठेतील हालचालींसह उत्पादनाची काढणी व हाताळणी करणे अपरिहार्य आहे कारण शेतीची कामे वेळेवर झाली पाहिजेत. तसेच किड व रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याबरोबरच सामाजिक स्वच्छता व सुरक्षितेच्या खबरदारीच्या उपाययोजनांचे पालन केले पाहिजे. या उपायांमध्ये सामाजिक अंतर ठेवणे, साबणाने हात स्वच्छ धुवून वैयक्तिक स्वच्छता राखणे, फेस मास्क परिधान करणे, संरक्षक कपडे आणि उपकरणे व यंत्रसामग्री स्वच्छ करणे या बाबींचा समावेश होतो. शेतावर काम करणाऱ्या लोकांसोबतच सर्वांनी covid-19 चा संसर्ग टाळण्यासाठी प्रत्येक टप्प्यावर काळजी घेणे महत्वाचे आहे.

१. गहू पिकाची काढणी जवळपास पूर्ण होत आली असून त्यासाठी मोठे गहू कापणीयंत्र राज्यामध्ये तसेच आजूबाजूच्या राज्यात वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे. सदर यंत्रांची दुरुस्ती,देखभाल करण्याऱ्या व हाताळणाऱ्या कामगारांनी तसेच शेतकरी/शेतमंजुर व त्याचे कुटुबातील सदस्य Covid-19 चा संसर्ग टाळण्यासाठी खबरदारी व काळजी घेणे आवश्यक आहे..
२. मसूर, मका आणि मिरची पिकाची काढणी सुरू असून आणि हरभरा पिकाची अंतिम टप्प्यात आहे.
३. फळ पिकांमध्ये आंबा, द्राक्ष, केळी तसेच भाजीपाला पिकांसह सर्व पिकांची काढणी/मळणी करणेसाठीच्या कामावर असलेल्या सर्व शेतमजुर/शेतकऱ्यांनी वैयक्तिक स्वच्छता आणि सामाजिक अंतर ठेवणे उपाययोजनांचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे.
४. हाताने काढणी करत असलेल्या कामगारांनी एकमेकांमध्ये ४-५ फूट अंतर राहील याची दक्षता घ्यावी.त्याचबरोबर काढणी आणि वेचणी करताना तोंडाला मास्क लावावा आणि ठराविक अंतराने हात स्वच्छ धुवावेत.
५. जेवताना,विश्रांती घेताना,शेतमाल गाडीत चढवत असताना व उतरवत असताना दोन व्यक्तीमध्ये ३-४ फूट अंतर राहील याची दक्षता घेण्यात यावी. शेतामध्ये काम करताना कामगारांची जास्त गर्दी होणार नाही याची काळजी घ्यावी.
६. शेतात काढणी करत असताना अनोळखी व्यक्तीस प्रवेश देऊ नये.
७. शेतमालाची काढणी करण्यासाठी शक्य असल्यास यंत्रांचा वापर करण्यात यावा.तसेच यंत्र हाताळण्यासाठी आवश्यक कामगार उपस्थितीत राहतील असे पहावे.
८. काढणी यंत्रांचा वापर केल्यास सदर यंत्रे, शेतमाल साठवून ठेवायच्या गोण्या व इतर साहित्य वापरण्यापूर्वी निर्जंतुक करून घेणे आवश्यक आहे. यंत्राचा वापर झाल्यानंतरहि निर्जंतुक करून ठेवावे.
९. मका व भूईमूग पिकाची काढणी करताना सामायिक यंत्र असल्या कारणाने काढणी यंत्राची स्वच्छता व निर्जंतुकीकरण करून मगच काढणी करावी.

शेतमाल कापणी,साठवणूक व विपणन :-

१. श्वसनमार्गाचा संसर्ग, एरोसोल आणि धूळ कणांपासून बचाव करण्यासाठी काढणी, मळणी, सुकवणी, मालाची प्रतवारी करताना व पॅकेजिंग करताना सर्व शेतकरी/ कामगारांनी चेहऱ्याला मास्क लावणे आवश्यक आहे.
२. शेतात / घरात कापणी केलेले धान्य, ज्वारी/बाजरी, डाळींच्या साठवण करण्या अगोदर योग्य वाळवून घ्या आणि किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मागील हंगामात ज्या ज्यूट पिशव्याचा वापर केला आहे त्या पुन्हा वापर करू नका . ५ टक्के कडुनिंब द्रावणात साठवणुकीच्या पिशव्या निर्जंतुक करून घ्याव्यात.
३. शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य भाव मिळेपर्यंत साठवणूक करण्यासाठी पुरेश्या प्रमाणात ज्यूट पिशव्यांची उपलब्धता व त्याचबरोबर शेतमाल साठवण्यासाठी गोदाम, शीतगृह व वेअर हाउसची सोय असावी.
४. शेतमालाची काढणी केल्यानंतर शेतमालाची हाताळणी, वाहतूक करताना तसेच प्रत्यक्ष लिलाव प्रक्रियेत भाग घेताना वैयक्तिक व सामाजिक स्वच्छता व एकमेकांमध्ये ४-५ फूट अंतर राहील याची दक्षता घ्यावी.
५. बियाणे उत्पादन करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांनी बियाणांचा पुरवठा बियाणे कंपनीला करताना आवश्यक ती सर्व कागदपत्रे सोबत ठेवावीत.
६. टोमॅटो, कारली, हिरव्या पालेभाज्या, काकडी,कोबी आदी भाज्यांचे थेट विपणन/पुरवठा करताना वरील प्रमाणे खबरदारी घ्यावी.

**कोविड-१९ चा संसर्ग टाळण्यासाठी तसेच प्रसार रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात याव्यात :-**

❖ खरीप हंगाम लक्षात घेता शेतकऱ्यांना आवश्यक व उपलब्ध बियाण्यांचा, सूक्ष्ममूलद्रव्ये,जैविक खते,सेंद्रीय खते यांचा पुरवठा सुरळीत होण्यासाठी विविध कृषि सेवा केंद्र, बियाणे व खते पुरवठा करणाऱ्या संस्था,बियाणे प्रमाणीकरण संस्था, वाहतूक करणाऱ्या यंत्रणा, संबधित अधिकारी व कर्मचारी यांना परवानगी पत्र /पास जिल्हाधिकारी /जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत देण्यात यावे.
❖ कृषि क्षेत्रात विविध पातळीवर काम करणाऱ्या कामगार वर्गास, शेतकऱ्यांना,तंत्रज्ञ, मदतनीस, वाहन चालक यांचे कोविड-१९ पासून संरक्षण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत घडिपत्रिका, पत्रके, माहिती पुस्तिका याद्वारे प्रतिबंधात्मक उपायोजना व काळजी कशी घ्यावी यांची मोठयाप्रमाणवर जनजागृती करण्यात यावी.
❖ खते,बियाणे व इतर कृषि साहित्य यांची वाहतूक इतर राज्यातून आपल्या राज्यात/जिल्ह्यात होत असेल तर संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्या साहित्याची पडताळणी करावी.
❖ पिक कापणी प्रयोगासाठी उपस्थित राहणाऱ्या सर्व अधिकारी ,कर्मचारी, विमा कंपनीचे प्रतिनिधी,शेतकरी यांना सदर कामासाठी परवानगी पत्र/पास देण्यात यावेत. पिक कापणी प्रयोगाची सर्व माहिती भरण्यासाठी मोबाईल अँप वापरणे बंधनकारक आहे.

- अतिवृष्टी, गारपीट,दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे,शेतमालाच्या नुकसानाची माहिती शासनास सादर करणे अनिवार्य राहील.
- शेतमाल काढणीनंतर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये शेत मालाची आवक-जावक करताना संबधित शेतकऱ्यांना, वाहन चालकांना, कामगारांना पास देण्यात यावा तसेच कोविड-१९ चा संसर्ग टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत जनजागृती करण्यात यावी.

## कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर कृषि यांत्रिकीकरण संदर्भात मार्गदर्शक सूचना :-

लॉकडाऊनच्या कालावधीत सुट दिलेली शेतीविषयक आणि शेती संलग्नकामे

- शेतकरी व शेत मजुरांमार्फत करण्यात येणारी शेतीची कामे.
- शेतीच्या कामांशी संबधित कस्टम हायरिंग सेंटर (कृषि औजारे बँक )
- जिल्ह्यांतर्गत व जिल्ह्याबाहेर शेती निगडीत मशीनची ने आण उदा.हार्वेस्टर,कापणी व पेरणी संबधित मशिन्स
- फळे व भाजीपाला पिकांचे उत्पादन, काढणी व पॅकेजींगसाठी लागणारे साधन साम्रगी तसेच सिंचनासाठी लागणारी इंजिन व उपकरणे

## शेतकऱ्यांसाठी सल्ला :-

**अ) पिकांची काढणी व मळणी -**

- राज्यात काही जिल्ह्यांमध्ये गहू,मोहरी,मका यासारख्या पिकांच्या काढणी /कापणीची कामे सुरु आहेत. सदर कामांसाठी कम्बाईन हार्वेस्टर, ट्रॅक्टर किवां इंजिन ऑपरेटेड हार्वेस्टर यासारख्या यंत्रांचा वापर करण्यात येतो. तसेच ज्या ठिकाणी अशा स्वरुपाची यंत्रे उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी मजुरांचे सहाय्याने कापणी करून थ्रेशर द्वारे मळणी करण्यात येते सदर यंत्रांच्या गावांतर्गत/ तालुक्यांतर्गत/ जिल्ह्यांतर्गत वाहतुकीसाठी परवानगी देण्यात आलेली आहे. मात्र यासाठी वैयक्तीक व सामाजिक सुरक्षेच्या सर्व उपाय योजना करणे आवश्यक आहे.
- ज्या ठिकाणी मजुरांमार्फत कामे करवून घेण्यात येतात अशा ठिकाणी दोन मजुरांमध्ये ४-५ फूट अंतर राहील याची दक्षता घ्यावी व सुरक्षेच्या सर्व उपाय योजना करणे आवश्यक आहे.
- शेतीची कामे शक्यतो यंत्रांच्या सहाय्यानेच करण्यात यावीत व कमीत कमी मनुष्यबळ वापरले जाईल याची दक्षता घ्यावी. तसेच शेतीकामासाठी वापरण्यात येणाऱ्या यंत्रसामुग्रीचे निर्जंतुकीकरण करण्यात यावे.
- विविध यंत्रावर काम करीत असताना मास्क,सॅनिटायजर,दोन मजुरांमध्ये आवश्यक अंतर ठेवणे यासारख्या प्रतिबंधात्मक सुरक्षेच्या सर्व उपाय योजना करणे आवश्यक आहे.

**ब) शेतमालाचे काढणी पश्चात साठवणूक व विपणन व्यवस्थापन -** तयार झालेला शेतमाल ट्रॅक्टर अथवा इतर वाहतुकीच्या साधनांमध्ये भरताना, वाहतूक करताना,उतरवताना व बाजारपेठेमध्ये नेताना COVID-19 च्या उद्रेक व प्रसार प्रतिबंधात्मक सुरक्षेच्या सर्व उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**क) शेतात उभ्या असलेल्या पिकांबाबत करावयाच्या उपाययोजना -** पीक संरक्षणाच्या संदर्भात शेतीची कामे करत असताना उपकरणे हाताळताना विषबाधा होऊ नये याबाबत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

-*-*-*-*-*-*-*-